# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

आयोजित

## 'जागर संवेदनांचा'

## सांगली व कोल्हापुर पुरग्रस्त आपत्ती निवारण
## विद्यापीठस्तरीय शिबिर

## दि : २२ ते २८ ऑगस्ट २०१९

# संक्षिप्त अहवाल







# उद्घाटन समारंभ

**दि. २२ ऑगस्ट रोजी पूरग्रस्त आपत्ती निवारण शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले यावेळी पालकमंत्री मा. नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, विभागीय आयुक्त डॉ. दिपक म्हैसेकर, कुलगुरू मा. डॉ. नितीन करमळकर, मा. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, व्यवस्थापन परिषद सदस्य मा. राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे, मा. प्रसेनजीत फडणवीस, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. सदानंद भोसले, रासेयो संचालक डॉ. प्रभाकर देसाई उपस्थित होते.**
















# सांगली व कोल्हापूर येथील सर्वेक्षण

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील १४ गावांचा ५०० विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन सर्व्हे करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी ७८३७ घरांपर्यंत पोहचले. ३९,१८५ लोकांशी त्यांनी संवाद साधला. यामध्ये प्रामुख्याने शेतीचे पंचनामे लवकर व्हावेत, पडलेल्या घरांची व्यवस्था लावावी, जनावरांसाठी चाऱ्याची सुविधा व्हावी, आरोग्य शिबिरांची व्यवस्था व्हावी अन्न-धान्याची सोय व्हावी, शालोपयोगी साहित्य मिळावे, पशुधन मिळावे व एकुणच मुलभुत सुविधा मिळाव्यात अशी येथील रहीवाशांच्या मागण्या आहेत.

















# स्वच्छता मोहीम

दि. २२ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०१९ या कालावधीत सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील १४ गावांमध्ये स्वछता मोहीम राबविण्यात आली. ३११ घरांची डागडुजी, १३ शाळांची स्वच्छता व नाले सफाई करण्यात आली. यामध्ये विद्यार्थांबरोबरच गावकऱ्यांनी देखील सहभाग नोंदविला.













# स्वच्छता मोहीम















# या शिबिराने आम्हाला काय दिले?

या आपत्ती निवारण शिबिरामुळे पुरग्रस्त भागातील रहीवाशांनी आमच्यासाठी केलेले अन्नदान, त्यांच्याकडून आम्हाला मिळालेले प्रेम हे सर्व पाहून आम्ही भारावून गेलो त्यामुळे नकळत आमच्यात देखील दातृत्वाचा भाव निर्माण झाला.

– प्रथमेश जगताप
आप्पासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे

कोल्हापूर भागात काम करत असताना तेथील गरिब कुटुंबांशी संवाद साधला घरात खायची मारामार असताना सुध्दा आमच्यासाठी आनंदाने कपभर चहा बनविणारी सत्तर वर्षाची आज्जी, तिने दिलेला आशिर्वाद हे सर्व अविस्मरणीय आहे, त्यामुळे तेथील लोकांशी प्रेमाची नाती तयार झाली आहेत.

– अक्षय खोचरे
कला वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

माणसातील माणुसकी नावाचा धर्म या शिबिरामुळे माझ्यात निर्माण झाला. आम्ही गावाचा निरोप घेत असताना गावकऱ्यांच्या डोळ्यातले पाणी आमच्या कामाची पोहचपावती देत होते.

– अनु कोंगरे
सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

श्रम, संस्कार आणि शिस्त याबरोबरच येथील लोकांच्या घरात डोकावताना गरिबीची दाहकता पाहून मन हेलावले. वेदनेला संवदनेची जोड दिली की माणुसपण जिवंत होते याची प्रचीती या शिबिराने आम्हाला दिले.

– रोशनी सोनवणे
एच.पी.टी.महाविद्यालय, नाशिक

एका घराचा सर्व्हे करीत असताना असे कळाले की, त्या घरातील एका मुलीच्या जिवावरती संपुर्ण कुटुंब चालते परंतु शिलाई मशीन पुरात वाहून गेल्यामुळे घरातील चुल बंद होती. आम्ही त्या घरात शिलाई मशिन देवून भाऊ होण्याचे कर्तव्य पार पाडले.

–मनोज गुंजाळ
प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी

सहा दिवस इतरांसाठी काम केल्यामुळे, तेथील गावकऱ्यांचे दुःख समजून घेतल्यामुळे आमचे ही मन नकळत हलके होऊन गेले मोबाईल सोशल मिडिया यामध्ये केवळ एकटेपणाची जाणीव व्हायची परंतु येथे आज माझी अनेक हक्काची घरे तयार झाली आहेत.

–ज्ञानेश्वरी देवरे
एच.पी.टी.महाविद्यालय, नाशिक

# एकुण परिणाम

## सांगली

- ९ गावांचे सर्वेक्षण
- २६७ विद्यार्थ्यांचा सहभाग
- ४८०३ घरांपर्यंत पोहचले
- २०,७२३ लोकांशी संवाद
- ७ शाळांची स्वच्छता

## कोल्हापूर

- ६ गावांचे सर्वेक्षण
- २३३ विद्यार्थ्यांचा सहभाग
- ३०३४ घरांपर्यंत पोहचले
- १८,४३२ लोकांशी संवाद
- ६ शाळांची स्वच्छता

## गावकऱ्यांच्या मागण्या

- शेतीचे पंचनामे
- पडलेल्या घरांची व्यवस्था लावावी
- जनावरांसाठी चाऱ्याची सुविधा व्हावी
- आरोग्य शिबिरांची व्यवस्था व्हावी
- अन्न-धान्याची सोय व्हावी
- शालोपयोगी साहित्य मिळावे
- पशुधन मिळावे

# याचसाठी केला होता अट्टाहास...!

दि. २८ ऑगस्ट २०१९ रोजी पूरग्रस्त आपत्ती निवारण शिबिराचा निरोप समारंभ संपन्न झाला. विद्यार्थांना निरोप देताना गावकऱ्यांचे डोळे देखील पाणावले होते. गांव सोडत असताना कोणाला हक्काची आज्जी तर कोणाला हक्काची बहिण मिळाली. वेदनेबरोबर जोडले गेलेले संवेदनेचे नाते माणुसकी नावाच्या वैश्विक धर्माची जाणीव करून देणारे ठरले. कदाचीत याचसाठी केला होता अट्टाहास...!














